मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई आणि तांत्रिक कक्ष (जल आराखडा), कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील एकूण ४८ पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ मंजुर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय, क्रमांक : मुदवा-२०१९/(प्र.क्र. ३८/१९)/खारभूमी

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ७ मार्च, २०१९

पहावे :-

१) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक मुदवा-२०१८/प्र. क्र. २८८/ खारभूमी, दि. ३०.१०.२०१८.

२) कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे या कार्यालयाचे क्र. कोंपाविम/आ-३/मुदतवाढ/६०७/सन २०१९, दिनांक १४.०२.२०१९ रोजीचे पत्र व सहपत्र.

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक -पदनि-२०१६ /प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदे आणि तांत्रिक कक्ष (जल आराखडा), कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १८ पदे असे एकूण ४८ पदांना संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.१०.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली होती. त्यानुसार मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदे आणि तांत्रिक कक्ष (जल आराखडा), कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १८ पदे असे एकूण ४८ पदांना दिनांक २८.०२.२०१९ च्या पुढे मुदतवाढ मंजूर करण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दिनांक २१.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ३० पदे आणि तांत्रिक कक्ष (जल आराखडा), कोंकण प्रदेश, मुंबई या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १८ पदे असे एकूण ४८ पदांना सोबतच्या परिशिष्ट "अ" येथे दर्शविल्याप्रमाणे खालील अटीच्या अधीन राहून दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ याद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

अ) नियत अस्थायी पदे ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसावी.

ब) नियत अस्थायी आस्थापनेवरील पदे ही दिनांक ०६.०२.२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर सुधारित आकृतीबंधानुसार ४५२९७ पदांच्या मर्यादेत असावीत.

३. वरील कार्यालयांच्या आस्थापनेवर होणारा खर्च " मागणी क्रमांक ४७०१ मोठे व मध्यम प्रकल्प यावरील भांडवली खर्च, ८०- सर्वसाधारण, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे (०४) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान (वेतन) (०४) (०३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (अनिवार्य) (४७०१ आय-१८९) या लेखाशिर्षाखाली टाकून तो मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक -पदनि-२०१६ /प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३०८१२३१०३७७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सहपत्र :- परिशिष्ट "अ "

Milind Anand Wani

Digitally signed by Milind Anand Wani
DN: CN = Milind Anand Wani, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.03.08 12:33:44 +05'30'

(मि. आ. वाणी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत सहपत्रासह :-

१. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
६. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,कोकण प्रदेश, मुंबई.
७. अवर सचिव (आ. पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
८. कक्ष अधिकारी (व्यय-१२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प-१९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१०.कार्यासने, अर्थ-२/आ(पुनर्रचना), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.खारभूमी कार्यासन (संग्रहार्थ)

परिशिष्ट "अ "

(शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. मुदवा-२०१९/(प्र.क्र. ३८/१९)/खारभूमी, दिनांक:- ०७ मार्च, २०१९)

अ.क्र	कार्यालयाचे नांव	पदनाम	पदसंख्या
(१)	(२)	(३)	(४)
(१)	**मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई**	१. मुख्य अभियंता	१
		२. सहाय्यक मुख्य अभियंता	२
		३. उप अभियंता	३
		४. कनिष्ट अभियंता/शाखा अभियंता	३
		५. मुख्य आरेखक	१
		६. विशेष अधीक्षक	१
		७. अधीक्षक	१
		८. मुख्य दप्तर कारकून	१
		९. प्रथम लिपिक	१
		१०. वरिष्ठ लिपिक	२
		११. कनिष्ठ लिपीक/टंकलेखक	५
		१२. उच्च श्रेणी लघुलेखक	१
		१३. दूरध्वनी चालक	१
		१४. वाहन चालक	१
		१५. दप्तरी	१
		१६. नाईक	१
		१७. शिपाई	३
		१८. चौकीदार	१
		एकूण	**३०**
(२)	**तांत्रिक कक्ष** (जल **आराखडा), कोकण प्रदेश, मुंबई**	१. उप अभियंता/अधिकारी	१
		२. कनिष्ठ अभियंता	४
		३. स्थापत्य अभियांत्रिकी सहायक	४
		४. वरिष्ठ लिपिक	१
		५. कनिष्ठ लिपिक/टंकलेखक	३
		६. आरेक्षक श्रेणी -३	१
		७. वाहन चालक	१

		८. शिपाई	२
		९. चौकीदार	१
		एकूण	**१८**
		एकूण (१) + (२)	**४८**

Milind Anand Wani

Digitally signed by Milind Anand Wani
DN: CN = Milind Anand Wani, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2019.03.08 12:34:08 +05'30'

(मि. आ. वाणी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन